SAMPLE CONTENT

# इतिहास व राज्यशास्त्र

# IQB Important Question Bank

नवीन कृतिपत्रिका प्रारूपावर आधारित




मेघना जाधव
M.A., M.Ed., SET (Edu., Geog.)

इयत्ता
दहावी
(मराठी माध्यम)

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४ यांच्या
**नवीन कृतिपत्रिका आराखड्यावर (२०१९-२०)** आधारित

# इतिहास व राज्यशास्त्र

# IQB Important Question Bank

## इयत्ता दहावी

**ठळक वैशिष्ट्ये**

- बोर्डाच्या नवीन प्रश्नपत्रिका आराखड्यानुसार प्रश्नांची मांडणी.
- कमीत कमी वेळेत परीक्षेची उत्तम तयारी.
- वैविध्यपूर्ण प्रश्नांचा समावेश
- प्रश्नोत्तरांची सुटसुटीत मांडणी.
- गुणनिहाय उत्तरांची मांडणी.
- स्वयंमूल्यमापनाकरता नमुना प्रश्नपत्रिकेचा समावेश.
- नमूना उत्तरपत्रिका **QR Code** मार्फत उपलब्ध.

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 378**

P.O. No. 6041

# प्रस्तावना

नमस्कार विद्यार्थी मित्रांनो,

शालेय स्तरावरील महत्त्वपूर्ण टप्प्यावर नवीन अभ्यासक्रम तुम्ही आत्मसात केला आहे. कमीत कमी वेळेत परीक्षेची उत्तम तयारी व्हावी या दृष्टीनेच **IQB** या पुस्तकाची रचना केली आहे. नवीन प्रश्नपत्रिका आराखड्यावर (२०१९-२०) आधारित **इतिहास व राज्यशास्त्र IQB इयत्ता दहावी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

या पुस्तकामध्ये 'इतिहास व राज्यशास्त्र' या विषयाच्या प्रश्नपत्रिकेच्या प्रारूपाचा सराव व्हावा याकरता विविध प्रश्नांची क्रमवार मांडणी केली आहे. मुख्य प्रश्नांमध्ये विचारल्या जाणाऱ्या विविध उपप्रकारांचाही समावेश त्यांच्या क्रमानुसार केला आहे. पाठाच्या स्वाध्यायामध्ये दिलेल्या प्रश्नांबरोबर इतरही महत्त्वाच्या प्रश्नांचा उत्तरांसहित समावेश केलेला आहे. संकल्पना, ओघतक्ता, तक्ता, कालरेषा यांसारख्या प्रश्नांची अनुरूप उत्तरे दिली आहेत. सर्व प्रश्नांची गुणनिहाय उत्तरे देण्यात आली आहेत. प्रश्नोत्तरांची मांडणी पाठानुक्रमे केली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना पाठानुरूप प्रश्नांचा सराव करणे सुलभ होईल. संपूर्ण प्रश्नपत्रिकेचे स्वरूप स्पष्ट व्हावे व स्वयंमूल्यमापन करता यावे यासाठी एक नमुना प्रश्नपत्रिका दिली आहे. अध्ययनाला तंत्रज्ञानाची जोड देत नमुना प्रश्नपत्रिकेची उत्तरपत्रिका **QR Code** मार्फत देण्यात आली आहे.

परीक्षेत घवघवीत यश संपादन करून देण्यात हे पुस्तक नक्कीच उत्तम मार्गदर्शक ठरेल असा आम्हांला विश्वास वाटतो. पुस्तक उत्कृष्ट व्हावे यासाठी आम्ही सर्वस्वी प्रयत्न केले आहेत. याची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत.

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** द्वितीय

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'History and Political Science; First Edition: 2018' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

Sample Content

**नवीन प्रश्नपत्रिका आराखडा**

**इयत्ता दहावी: इतिहास व राज्यशास्त्र**

**(इतिहास : २८ गुण, राज्यशास्त्र : १२ गुण, एकूण : ४० गुण)**

**वेळ: २ तास**

## इतिहास

| प्र.क्र. | | प्रश्नाचे स्वरूप | विकल्प | गुण | विकल्पासह एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| प्र.१. | अ. | दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा. | - | ०३ | ०३ |
| | ब. | पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व लिहा. | - | ०३ | ०३ |
| प्र.२. | अ. | दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा. यामध्ये संकल्पनाचित्र, तक्ता पूर्ण करा, कालरेषा तयार करा, ओघतक्ता तयार करा, घटना कालानुक्रमे योग्य ठिकाणी दर्शवा असे प्रश्न प्रकार येतील. | ३ पैकी २ | ०४ | ०६ |
| | ब. | टिपा लिहा. / संकल्पना स्पष्ट करा. | ३ पैकी २ | ०४ | ०६ |
| प्र.३. | | पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. | ४ पैकी २ | ०४ | ०८ |
| प्र.४. | | दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. (यामध्ये प्रत्येकी १ गुणांचे २ प्रश्न व २ गुणांचा १ मुक्तोत्तरी प्रश्न असतील.) | - | ०४ | ०४ |
| प्र.५. | | पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. | ४ पैकी २ | ०६ | १२ |
| | | **एकूण गुण** | | **२८** | **४२** |

Sample Content

# राज्यशास्त्र

| प्र.क्र. | प्रश्नाचे स्वरूप | विकल्प | गुण | विकल्पासह एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| प्र.६ | दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा. | - | ०२ | ०२ |
| प्र.७ | पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. | ३ पैकी २ | ०४ | ०६ |
| प्र.८. | अ. पुढील संकल्पना स्पष्ट करा. | २ पैकी १ | ०२ | ०४ |
| | ब. दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. यात तक्ता पूर्ण करा, कालरेषा पूर्ण करा. पायऱ्या लिहा, ओघतक्ता पूर्ण करा, संकल्पनाचित्र पूर्ण करा असे प्रश्न असतील. | २ पैकी १ | ०२ | ०४ |
| प्र.९. | पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. | २ पैकी १ | ०२ | ०४ |
| | **एकूण गुण** | | **१२** | **२०** |

[महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४]

Sample Content

# अनुक्रमणिका


| प्र.क्र. | प्रश्नाचे स्वरूप | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| **इतिहास** | | | |
| प्र.१. | अ. | दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा. | १ |
| | ब. | पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व लिहा. | १० |
| प्र.२. | अ. | दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा. | १८ |
| | ब. | टिपा लिहा. / संकल्पना स्पष्ट करा. | ३२ |
| प्र.३. | पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. | | ४६ |
| प्र.४. | दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. | | ५६ |
| प्र.५. | पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. | | ७० |
| **राज्यशास्त्र** | | | |
| प्र.६. | दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा. | | १०० |
| प्र.७. | पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. | | १०६ |
| प्र.८. | अ. | पुढील संकल्पना स्पष्ट करा. | ११४ |
| | ब. | दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. | १२१ |
| प्र.९. | पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. | | १२९ |
| | नमुना प्रश्नपत्रिका | | १३७ |


**टीप: पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने, पाठाअंतर्गत प्रश्न # चिन्हाने दर्शवले आहेत.**

Sample Content

# प्रश्नपत्रिका प्रारूपाचे सविस्तर विवेचन

## इतिहास व राज्यशास्त्र

**वेळ : २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व कृती/प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

ii. उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतीचे पूर्ण गुण दर्शवतात.

iii. प्रश्न क्रमांक १ ते ५ इतिहास व प्रश्न क्रमांक ६ ते ९ राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.

iv. प्रश्न क्रमांक १ (अ) आणि ६ मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.

v. प्रश्न क्रमांक २ (अ) आणि ८ (ब) मधील दिलेली संकल्पनाचित्रे त्याच नमुना आराखड्यानुसार पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

### इतिहास

**प्र.१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा. (३)**

या प्रश्नाकरता ३ गुण असतील. यामध्ये प्रत्येकी एका गुणाचे ३ प्रश्न असतील. या प्रश्नाला विकल्प असणार नाही. विद्यार्थ्यांनी सर्व प्रश्न सोडवणे अपेक्षित आहेत. तसेच, उत्तरपत्रिकेमध्ये केवळ उत्तराचा पर्याय न लिहिता उत्तरासहित पूर्ण वाक्य लिहिणे व उत्तर अधोरेखित (underline) करणे आवश्यक आहे.

**प्र.१. (ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व लिहा. (३)**

प्रत्येक प्रश्नाला १ गुण याप्रमाणे हा ३ गुणांचा प्रश्न असेल. या प्रश्नप्रकारामध्ये ४ जोड्यांचा एक गट याप्रमाणे ३ प्रश्न विचारले जातील. प्रत्येक गटातील एक चुकीची जोडी ओळखून ती लिहिणे अपेक्षित आहे. या प्रश्नाला विकल्प असणार नाही. विद्यार्थ्यांनी सर्व प्रश्न सोडवणे अनिवार्य आहे.

**प्र.२. (अ) दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा. (कोणतीही दोन) (४)**

या प्रश्नप्रकाराकरता ४ गुण असतील. यातील ३ प्रश्नांपैकी कोणतेही २ प्रश्न सोडवणे अपेक्षित आहे. प्रत्येक प्रश्न २ गुणांचा असेल. या प्रश्नप्रकारात 'संकल्पनाचित्र', 'तक्ता पूर्ण करा', 'कालरेषा पूर्ण करा', 'ओघतक्ता पूर्ण करा', 'घटना कालानुक्रमे योग्य ठिकाणी दर्शवा' असे प्रश्नप्रकार येतील. हा प्रश्न सोडवताना उत्तरपत्रिकेमध्ये संकल्पनाचित्र, तक्ता, कालरेषा, ओघतक्ता पेनाने काढणे अपेक्षित आहे.

Sample Content

**प्र.२. (ब) टिपा लिहा. (कोणत्याही दोन) (४)**

हा प्रश्न ४ गुणांचा असेल. प्रत्येकी २ गुणांचे ३ प्रश्न विचारले जातील. विद्यार्थ्यांनी त्यांपैकी कोणतेही २ प्रश्न सोडवणे अपेक्षित आहे. उत्तराच्या उत्तम मांडणीकरता उत्तर मुद्द्यांच्या स्वरूपात लिहावे.

**प्र.३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतीही दोन) (४)**

हा प्रश्न ४ गुणांचा असेल. यात प्रत्येकी २ गुणांची ४ विधाने असतील. विद्यार्थ्यांनी त्यांपैकी कोणतीही २ विधाने सकारण स्पष्ट करणे अपेक्षित आहे.

**प्र.४. उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. (४)**

उताऱ्यावरील प्रश्न ४ गुणांचा असेल. यामध्ये प्रत्येकी १ गुणाचे २ प्रश्न व २ गुणांचा १ मुक्तोत्तरी प्रश्न समाविष्ट असेल. हे प्रश्न केवळ लेखन, वाचन तपासणारे नव्हे, तर इतिहास विषयाचे ज्ञान व आकलन तपासणारे असल्याने विद्यार्थ्यांनी उताऱ्याचे काळजीपूर्वक वाचन करावे. मुक्तोत्तरी प्रश्नाचे उत्तर उताऱ्यातील संदर्भ घेऊन स्वत:च्या शब्दांत लिहावे. या प्रश्नाला विकल्प असणार नाही. विद्यार्थ्यांनी तीनही प्रश्न सोडवणे अनिवार्य आहे.

**प्र.५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (६)**

हा प्रश्न ६ गुणांचा असेल. यात प्रत्येकी ३ गुणांच्या ४ प्रश्नांपैकी कोणतेही २ प्रश्न सोडवणे अपेक्षित आहे.

- तक्त्याच्या मदतीने सविस्तर उत्तर लिहा.
- ऐतिहासिक प्रक्रिया/ टप्पे सविस्तर स्पष्ट करा.
- साम्य व फरकाचे मुद्दे शोधा.
- दोन घटनांमधील परस्परसंबंध/ कारणमीमांसा लिहा.
- विस्तृत निबंधवजा प्रश्नांची उत्तरे लिहा.
- चित्राचे/ आकृतीचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा.

अशा प्रश्नप्रकारांपैकी कोणतेही प्रश्न विचारले जातील. उत्तरांच्या उत्तम मांडणीकरता उत्तरे मुद्द्यांच्या स्वरूपात लिहावीत.

Sample Content

## राज्यशास्त्र

**प्र.६. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा. (२)**

हा प्रश्न २ गुणांचा असेल. यात प्रत्येकी १ गुणाचे २ प्रश्न असतील. या प्रश्नाला विकल्प असणार नाहीत. सर्व प्रश्न सोडवणे अनिवार्य आहे. उत्तरपत्रिकेमध्ये केवळ उत्तराचा पर्याय न लिहिता उत्तरासहित पूर्ण वाक्य लिहिणे व उत्तर अधोरेखित (underline) करणे आवश्यक आहे.

**प्र.७. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतीही दोन) (४)**

हा प्रश्न ४ गुणांचा असेल. या प्रश्नप्रकारात ३ विधाने दिली असतील. त्यांपैकी कोणतीही २ विधाने सोडवणे अपेक्षित आहे. ही विधाने चूक की बरोबर आहेत हे विद्यार्थ्यांनी नमूद करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर चुकीच्या व बरोबर अशा दोन्हीं विधानांसाठी स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे.

विधान चूक की बरोबर हे ओळखणे व त्याचे स्पष्टीकरण लिहिणे यास २ गुण मिळतील. विधान चूक की बरोबर ओळखण्यास १ गुण व स्पष्टीकरणास १ गुण अशी गुण विभागणी असल्याने विधानाचे स्पष्टीकरण न लिहिल्यास १ गुण कमी केला जाऊ शकतो.

**प्र.८. अ. पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणतीही एक) (२)**

हा प्रश्न २ गुणांचा असेल. दिलेल्या २ संकल्पनांपैकी कोणतीही १ संकल्पना स्पष्ट करणे अपेक्षित आहे. प्रत्येक संकल्पनेकरता २ गुण असतील.

**प्र.८. ब. दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (कोणतीही एक) (२)**

या प्रश्नप्रकारासाठी २ गुण असतील. यातील २ प्रश्नांपैकी कोणताही १ प्रश्न सोडवणे अपेक्षित आहे. प्रत्येक प्रश्न २ गुणांचा असेल. या प्रश्नप्रकारात पाठातील एखाद्या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित चित्ररूप आकृती पूर्ण करणे अपेक्षित आहे. यात 'संकल्पनाचित्र', 'तक्ता पूर्ण करा', 'कालरेषा पूर्ण करा', 'ओघतक्ता पूर्ण करा' असे प्रश्नप्रकार येतील. हा प्रश्न सोडवताना उत्तरपत्रिकेमध्ये संकल्पनाचित्र, तक्ता, कालरेषा, ओघतक्ता पेनाने काढणे अपेक्षित आहे.

**प्र.९. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा. (कोणताही एक) (२)**

हा प्रश्न २ गुणांचा असेल. या प्रश्नप्रकारात दिलेल्या २ प्रश्नांपैकी कोणताही १ प्रश्न सोडवणे अपेक्षित आहे. प्रत्येक प्रश्नाला २ गुण असतील. उत्तरांच्या उत्तम मांडणीकरता उत्तरे मुद्द्यांच्या स्वरूपात लिहावीत.

Sample Content

# प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

## पाठ १. इतिहासलेखन: पाश्चात्य परंपरा

१. ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याच्या परंपरेची सुरुवात मेसोपोटेमियातील ________ संस्कृतीमध्ये झाली.

(अ) सुमेर (ब) ग्रीक (क) चिनी (ड) हडप्पा

**उत्तर:** ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याच्या परंपरेची सुरुवात मेसोपोटेमियातील सुमेर संस्कृतीमध्ये झाली.

२. आधुनिक इतिहासलेखनाच्या परंपरेची बीजे प्राचीन ________ इतिहासकारांच्या लेखनात आढळतात.

(अ) भारतीय (ब) जर्मन (क) ग्रीक (ड) फ्रेंच

**उत्तर:** आधुनिक इतिहासलेखनाच्या परंपरेची बीजे प्राचीन ग्रीक इतिहासकारांच्या लेखनात आढळतात.

३. 'हिस्टरी' हा शब्द ________ भाषेतील आहे.

(अ) इंग्रजी (ब) ग्रीक (क) फ्रेंच (ड) जर्मन

**उत्तर:** 'हिस्टरी' हा शब्द ग्रीक भाषेतील आहे.

*४. आधुनिक इतिहासलेखनाचा जनक ________ यास म्हणता येईल.

(अ) व्हॉल्टेअर (ब) रेने देकार्त

(क) लिओपॉल्ड रांके (ड) कार्ल मार्क्स

**उत्तर:** आधुनिक इतिहासलेखनाचा जनक व्हॉल्टेअर यास म्हणता येईल.

५. सीमाँ-द-बोव्हा या ________ विदुषीने स्त्रीवादाची मूलभूत भूमिका सिद्ध केली.

(अ) अमेरिकन (ब) आफ्रिकन (क) फ्रेंच (ड) जर्मन

**उत्तर:** सीमाँ-द-बोव्हा या फ्रेंच विदुषीने स्त्रीवादाची मूलभूत भूमिका सिद्ध केली.

Sample Content

*६. 'आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज' हा ग्रंथ ________ याने लिहिला.

(अ) कार्ल मार्क्स (ब) मायकेल फुको

(क) लुसिआँ फेबर (ड) व्हॉल्टेअर

**उत्तर:** 'आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज' हा ग्रंथ मायकेल फुको याने लिहिला.

**[टीप:** पाठ १ संबंधित प्रश्न नमुनादाखल सोडवून दिले आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांनी सर्व पाठांसंबंधित प्रश्नांची उत्तरे लिहिणे अपेक्षित आहे.]

## पाठ २. इतिहासलेखन:भारतीय परंपरा

७. सोहगौडा ताम्रपट ________ या राज्यात सापडला.

(अ) मध्य प्रदेश (ब) उत्तर प्रदेश (क) राजस्थान (ड) आसाम

**उत्तर: उत्तर प्रदेश**

८. 'तुझुक-इ बाबरी' हे आत्मचरित्र ________ याचे आहे.

(अ) औरंगजेब (ब) बाबर

(क) अल्तमश (ड) मुहम्मद बिन तुघलक

**उत्तर: बाबर**

*९. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे पहिले सरसंचालक ________ हे होत.

(अ) अलेक्झांडर कनिंगहॅम (ब) विल्यम जोन्स

(क) जॉन मार्शल (ड) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

**उत्तर: अलेक्झांडर कनिंगहॅम**

*१०. 'हितोपदेश' या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद ________ यांनी केला.

(अ) जेम्स मिल (ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

(क) माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन (ड) जॉन मार्शल

**उत्तर: फ्रेडरिक मॅक्सम्युलर**

११. 'द राईज ऑफ द मराठा पॉवर' या ग्रंथाचे लेखन ________ या समाजसेवकाने केले.

(अ) गोपाळ गणेश आगरकर (ब) राजा राममोहन रॉय

(क) महात्मा जोतिबा फुले (ड) न्या. महादेव गोविंद रानडे

**उत्तर: न्या. महादेव गोविंद रानडे**

१२. 'प्रिमिटिव्ह कम्युनिझम टु स्लेव्हरी' हे पुस्तक ________ इतिहासलेखनाचे उदाहरण आहे.

**[मार्च २०१९]**

(अ) वसाहतवादी (ब) प्राच्यवादी (क) राष्ट्रवादी (ड) मार्क्सवादी

**उत्तर: मार्क्सवादी**

Sample Content

Page no. **3** to **9** are purposely left blank. To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# प्र.१ (ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व लिहा.

## पाठ १. इतिहासलेखन: पाश्चात्त्य परंपरा

*१. **[मार्च २०१९]**

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| i. | जार्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल | रिझन इन हिस्टरी |
| ii. | लिओपॉल्ड व्हॉन रांके | द थिअरी अँड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी |
| iii. | हिरोडोटस | द हिस्टरिज् |
| iv. | कार्ल मार्क्स | डिस्कोर्स ऑन द मेथड |

**उत्तर:** कार्ल मार्क्स – डिस्कोर्स ऑन द मेथड

२.

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| i. | हिरोडोटस | हिस्टरी शब्दाचा सर्वप्रथम वापर |
| ii. | व्हॉल्टेअर | आधुनिक इतिहासलेखनाचा जनक |
| iii. | जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल | ॲनल्स प्रणाली |
| iv. | मायकेल फुको | इतिहासातील स्थित्यंतराच्या स्पष्टीकरणावर भर |

**उत्तर:** जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल – ॲनल्स प्रणाली

३.

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| i. | द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी | लिओपॉल्ड व्हॉन रांके |
| ii. | डिस्कोर्स ऑन द मेथड | सीमॉं-द-बोव्हा |
| iii. | आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज | मायकेल फुको |
| iv. | एनसायक्लोपीडिया ऑफ फिलॉसॉफिकल सायन्सेस | जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल |

**उत्तर:** डिस्कोर्स ऑन द मेथड – सीमॉं-द-बोव्हा

Sample Content

Page no. **11** to **17** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**


Sample Content

# प्र.२ (अ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा.


## पाठ १. इतिहासलेखन: पाश्चात्य परंपरा

***१. दिलेले संकल्पनाचित्र पूर्ण करा.**

i.




**उत्तर:**




**इतर विचारवंत**

१. सीमाँ-द-बोव्हा

२. लिओपॉल्ड व्हॉन रांके

३. व्हॉल्टेअर

[**टीप:** विद्यार्थ्यांना वरीलपैकी कोणत्याही चार युरोपीय इतिहास विचारवंतांची नावे लिहिता येतील.]

**२. तक्ता पूर्ण करा.**

i.

| ii. | इतिहासकार | त्यांचे विचार |
|---|---|---|
| अ. | ............... | इतिहासाची कालक्रमानुसार अखंड मांडणी करण्याची पद्धती चुकीची आहे. |
| ब. | ............... | स्त्रीवादाची मूलभूत भूमिका सिद्ध केली. |
| क. | ............... | इतिहास हा अमूर्त कल्पनांचा नसून जिवंत माणसांचा असतो. |
| ड. | ............... | इतिहासलेखनाकरता वापरल्या जाणाऱ्या ऐतिहासिक साधनांची विशेषत: कागदपत्रांची विश्वासार्हता तपासून घेणे आवश्यक आहे. |

Sample Content

Page no. **19** to **31** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# प्र.२ (ब) टिपा लिहा. / संकल्पना स्पष्ट करा.

## पाठ १. इतिहासलेखन: पाश्चात्य परंपरा

***१. द्वंद्ववाद**

**उत्तर:** i. जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल या जर्मन तत्त्वज्ञाने ऐतिहासिक वास्तवाच्या तर्कशुद्ध मांडणीसाठी द्वंद्ववाद ही विचार पद्धती मांडली आहे.

ii. हेगेलच्या मतानुसार, कोणत्याही घटनेचा अर्थ लावण्याकरता तिची दोन विरोधी प्रकारांत वर्गवारी करावी लागते, उदा. खरे-खोटे, चांगले-वाईट. याप्रकारे विचार करण्याच्या पद्धतीला द्वंद्ववाद (डायलेक्टिक्स) असे म्हटले जाते.

iii. या पद्धतीमध्ये प्रथम एक सिद्धांत मांडला जातो. त्यानंतर या सिद्धांताला छेद देणारा (विरोध दर्शवणारा) प्रतिसिद्धांत मांडला जातो.

iv. या दोन्ही सिद्धांतांचा तर्काच्या आधारे ऊहापोह केल्यानंतर त्या दोन्हींचे सार ज्यामध्ये सामावलेले आहे, अशा सिद्धांताची समन्वय साधणारी अशी मांडणी केली जाते.

***२. ॲनल्स प्रणाली**

**उत्तर:** i. ही आधुनिक इतिहासलेखनाची प्रणाली असून विसाव्या शतकाच्या सुरुवातीला ती फ्रान्समध्ये उदयास आली.

ii. या प्रणालीमध्ये इतिहासाचा अभ्यास केवळ राजे, महान नेते, त्यांची राजकीय मुत्सद्देगिरी किंवा राजकीय घडामोडी आणि युद्धे यांवरच केंद्रित न करता त्या काळातील हवामान, स्थानिक लोक, शेती व व्यापार, दळणवळण, तंत्रज्ञान, संपर्क साधने, तसेच सामाजिक विभागणी व समूहाची मानसिकता यांसारखे विषयदेखील अभ्यासणे महत्त्वपूर्ण मानले जाऊ लागले.

iii. ॲनल्स प्रणालीमुळे इतिहासलेखनाला एक निराळीच दिशा प्राप्त झाली.

iv. ही इतिहासलेखनाची प्रणाली सुरू करण्याचे व तिचा विकास करण्याचे सारे श्रेय फ्रेंच इतिहासकारांना दिले जाते.

## पाठ २. इतिहासलेखन: भारतीय परंपरा

**३. वसाहतवादी इतिहासलेखन**

**उत्तर:** i. भारतीय इतिहासाचा अभ्यास व लेखन करणाऱ्या इतिहासकारांमध्ये सुरुवातीला ब्रिटिश अधिकारी व ख्रिश्चन धर्मप्रसारकांचा समावेश होता.

Sample Content

Page no. **33** to **45** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# प्र.३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

## पाठ १. इतिहासलेखन: पाश्चात्य परंपरा

***१. स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित विविध पैलूंवर विचार करणारे संशोधन सुरू झाले.**

**उत्तर:** i. स्त्रीवादी इतिहासाचे लेखन म्हणजे स्त्रियांच्या दृष्टिकोनातून इतिहासाची पुनर्रचना करणे होय. सीमाँ-द-बोव्हा या फ्रेंच विदुषीने स्त्रीवादाची मूलभूत भूमिका मांडली.

ii. या प्रकारच्या इतिहासलेखनामध्ये स्त्रियांचा अंतर्भाव करणे महत्त्वाचे आहे; मात्र त्याचबरोबर या क्षेत्रातील पुरुषप्रधान दृष्टिकोनाचाही पुनर्विचार करण्यावर भर दिला गेला आहे.

वरील कारणास्तव स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित विविध पैलू जसे- कौटुंबिक आयुष्य, नोकरी इत्यादींवर विचार करणारे संशोधन सुरू झाले.

***२. फुको यांच्या लेखनपद्धतीला ज्ञानाचे पुरातत्त्व म्हटले आहे.**

**उत्तर:** i. विसाव्या शतकामधील फ्रेंच इतिहासकार मायकेल फुको यांच्या लिखाणातून इतिहासलेखनाची एक नवीन संकल्पना पुढे आली.

ii. त्यांनी इतिहासाच्या कालक्रमानुसार केलेल्या अखंड मांडणीला चुकीचे म्हटले आहे.

iii. तसेच, भूतकाळातील स्थित्यंतराचे स्पष्टीकरण देण्यावर भर दिला.

iv. त्यांच्या मते पुरातत्त्वामध्ये अंतिम ऐतिहासिक सत्यापर्यंत पोहोचणे हे उद्दिष्ट नसून भूतकाळातील स्थित्यंतरांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न असतो.

म्हणूनच, भूतकाळातील स्थित्यंतरांचे ज्ञान देणाऱ्या आपल्या लेखनपद्धतीला त्यांनी ज्ञानाचे पुरातत्त्व म्हटले आहे.

***३. व्हॉल्टेअर यांना आधुनिक इतिहासलेखनाचे जनक असे म्हटले जाते.**

**उत्तर:** i. व्हॉल्टेअर यांनी इतिहासलेखन करताना केवळ वस्तुनिष्ठ सत्य आणि घटनांचा कालक्रम यांवर भर न देता, तत्कालीन समाजाच्या परंपरा, आर्थिक व्यवस्था, शेती, व्यापार इत्यादींचाही विचार करणे आवश्यक आहे, हा विचार मांडला.

ii. यामुळे, इतिहासाच्या मांडणीमध्ये सर्वांगीण मानवी जीवनाचा विचार होणे गरजेचे आहे, हा विचार पुढे आला.

इतिहासलेखनामध्ये मांडलेल्या या आधुनिक विचारांमुळे व्हॉल्टेअर यांना आधुनिक इतिहासलेखनाचा जनक असे म्हणतात.

Sample Content

Page no. **47** to **55** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# प्र. ४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.

## पाठ १. इतिहासलेखन: पाश्चात्त्य परंपरा

१.

**[इतिहासात उपलब्ध पुराव्याचे ..........................................**
**... .......................................... स्वरूपात उपयोग केला जातो.]**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. २)

i. इतिहासलेखन म्हणजे काय? (१)

ii. इतिहासकारावर इतिहासाची मांडणी का अवलंबून असते? (१)

iii. प्राचीन काळातील लोक ऐतिहासिक घटनांच्या नोंदी ठेवत असतील, असे तुम्हांला वाटते का? (२)

**उत्तरे:**

i. उपलब्ध पुराव्यांचे चिकित्सकपणे संशोधन करून भूतकाळामध्ये घडून गेलेल्या घटनांची मांडणी करण्याच्या लेखन पद्धतीला इतिहासलेखन म्हणतात.

ii. इतिहासाची मांडणी करत असताना भूतकाळामध्ये घडून गेलेल्या प्रत्येक घटनेची नोंद करून तिची माहिती देणे इतिहासकाराला शक्य नसल्याने वाचकांपर्यंत जे पोहोचवायचे आहे, अशाच भूतकाळातील घटनांची तो निवड करतो व त्या दृष्टिकोनानुसार इतिहासाची मांडणी करतो, म्हणून इतिहासाची मांडणी इतिहासकारावर अवलंबून असते.

iii. प्राचीन काळातील लोक ऐतिहासिक घटनांची नोंद ठेवत असतील असे मला वाटते कारण -

अ. प्राचीन संस्कृतीमध्ये इतिहासलेखन करण्याची परंपरा नव्हती; परंतु पूर्वजांच्या जीवनाच्या, पराक्रमाच्या गोष्टी पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची आवश्यकता त्यांना जाणवत होती.

ब. जगभरातील संस्कृतींमध्ये गुहाचित्रांद्वारे स्मृतींचे जतन, कहाण्यांचे कथन, गीत पोवाड्यांचे गायन यांसारख्या परंपरागत साधनांचा वापर होत असे.

२.

**[इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या ....................................**
**.................................... इतिहासाच्या अभ्यासाची केंद्रे बनली.]**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ३)

i. इसवी सनाच्या अठराव्या शतकापूर्वी युरोपातील विद्यापीठांमध्ये कोणत्या विषयांना महत्त्व होते? (१)

Sample content

Page no. **57** to **69** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# प्र.५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

## पाठ १. इतिहासलेखन: पाश्चात्य परंपरा

**१. इतिहासाच्या दस्तऐवजांचे विश्लेषण इतिहासतज्ज्ञ कशारीतीने करतात?**

**उत्तर: प्रस्तावना:** भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची क्रमश: संगती लावून त्यांचे आकलन होण्यासाठी संशोधन केले जाते. यासाठी इतिहासतज्ज्ञ इतिहासाच्या दस्तऐवजांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करतात.

i. ऐतिहासिक दस्तऐवजाची भाषा व लिपी जाणून घेऊन त्याचा अर्थ लावला जातो.

ii. यासाठी दस्तऐवज लिहिणाऱ्याची भाषाशैली, अक्षरांचे वळण, कागदाच्या निर्मितीचा काळ व प्रकार, तसेच त्यावरील अधिकारदर्शक मुद्रा यांद्वारे दस्तऐवजाचा खरेपणा ठरवला जातो.

iii. यानंतर इतर ऐतिहासिक संदर्भांचे तौलनिक विश्लेषण केले जाते. त्या आधारे दस्तऐवजाची विश्वासार्हता पडताळली जाते.

**निष्कर्ष:** अशारीतीने इतिहासतज्ज्ञ चिकित्सकपणे इतिहासाचे विश्लेषण करतात.

***२. इतिहासलेखन म्हणजे काय?**

**उत्तर:** i. इतिहासातील उपलब्ध पुराव्यांचे चिकित्सापूर्वक संशोधन करून भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची मांडणी करण्याच्या लेखन पद्धतीला इतिहासलेखन असे म्हणतात.

ii. पूर्वजांच्या जीवनाच्या पराक्रमाच्या गोष्टी पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आधुनिक इतिहासलेखनामध्ये विविध परंपरांचा साधनांच्या स्वरूपात उपयोग केला जातो.

iii. अतिप्राचीन काळापासून जगभरातील संस्कृतींमध्ये गुहाचित्रांद्वारे स्मृतींचे जतन, कहाण्यांचे कथन, गीत आणि पोवाड्यांचे गायन यांसारख्या परंपरा अस्तित्वात होत्या.

***३. आधुनिक इतिहासलेखन पद्धतीची चार वैशिष्ट्ये कोणती?**

**उत्तर: प्रस्तावना:** इतिहासातील उपलब्ध पुराव्यांचे संशोधन करून भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची मांडणी करण्याच्या लेखन पद्धतीला इतिहासलेखन असे म्हणतात. आधुनिक इतिहासलेखन पद्धतीची चार वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

i. आधुनिक इतिहासलेखन पद्धती ही शास्त्रशुद्ध असून तिची सुरुवात प्रश्नांची योग्य मांडणी करण्यापासून होते.

ii. हे प्रश्न मानवकेंद्रित म्हणजेच मानवी कृतींविषयी असतात आणि मानवी कृतींचा संबंध देवदेवतांच्या कथा किंवा दैवी घटना यांच्याशी जोडण्याचा प्रयत्न या इतिहासामध्ये केला जात नाही.

Sample Content

Page no. **71** to **99** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# प्र.६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

## पाठ १. संविधानाची वाटचाल

१. भारतात संविधानानुसार राज्यकारभार करण्यास ______ पासून सुरुवात झाली.

अ. २६ जानेवारी १९४९ ब. २६ नोव्हेंबर १९४९

क. २६ जानेवारी १९५० ड. १५ ऑगस्ट १९४७

**उत्तर:** भारतात संविधानानुसार राज्यकारभार करण्यास २६ जानेवारी १९५० पासून सुरुवात झाली.

*२. लोकशाहीचा गाभा म्हणजे ________. **[मार्च २०१९]**

अ. प्रौढ मताधिकार ब. सत्तेचे विकेंद्रीकरण

क. राखीव जागांचे धोरण ड. न्यायालयीन निर्णय

**उत्तर:** लोकशाहीचा गाभा म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण.

३. ७३ व ७४ वी संविधान दुरुस्ती हा भारतात ________ साठी सर्वांत मोठा प्रयत्न आहे.

अ. मतदानाच्या अधिकारा ब. लोकशाहीच्या विकेंद्रीकरणा

क. सामाजिक न्याया ड. समानते

**उत्तर:** ७३ व ७४ वी संविधान दुरुस्ती हा भारतात लोकशाहीच्या विकेंद्रीकरणा साठी सर्वांत मोठा प्रयत्न आहे.

४. माहितीचा अधिकार ________ मुळे शासनव्यवहार अधिक खुले व पारदर्शी होण्यास मदत झाली.

अ. २००७ ब. २००५ क. २०१० ड. २०१२

**उत्तर:** माहितीचा अधिकार २००५ मुळे शासनव्यवहार अधिक खुले व पारदर्शी होण्यास मदत झाली.

*५. पुढील कोणत्या कायद्याद्वारे महिलांना त्यांचे स्वातंत्र्य जपण्यास आणि स्वत:चा विकास साधण्यास अनुकूल वातावरण निर्माण केले आहे? ________.

अ. माहितीचा अधिकार कायदा ब. हुंडा प्रतिबंधक कायदा

क. अन्नसुरक्षा कायदा ड. यांपैकी कोणतेही नाही.

**उत्तर:** हुंडा प्रतिबंधक कायद्याद्वारे महिलांना त्यांचे स्वातंत्र्य जपण्यास आणि स्वत:चा विकास साधण्यास अनुकूल वातावरण निर्माण केले आहे.

Sample Content

Page no. **101** to **113** are purposely left blank. To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# प्र.८ (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा.

## पाठ १. संविधानाची वाटचाल

**१. लोकशाही विकेंद्रीकरण**

**उत्तर:** i. सत्तेचे विकेंद्रीकरण करणे हा लोकशाहीचा गाभा आहे. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये लोकशाही विकेंद्रीकरणासंबंधित तरतुदी आहेत.

ii. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्वतंत्र भारतात लोकशाही विकेंद्रीकरणाचे खूप प्रयत्न झाले असून यामध्ये सर्वांत मोठा प्रयत्न ७३ व ७४ व्या संविधान दुरुस्तीचा होता.

iii. या दुरुस्त्यांमुळे स्थानिक शासनसंस्थांना संविधानाची मान्यता मिळाली, शिवाय त्यांच्या अधिकारामध्येही खूप मोठी वाढ झाली.

iv. यामुळे, सत्तेचा गैरवापर करण्याला आळा बसतो, शिवाय सामान्य जनतेलाही या सत्तेत सहभागी होता येते.

***२. माहितीचा अधिकार (२००५)** **[मार्च २०१९]**

**उत्तर:** i. प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही सुशासनाची दोन वैशिष्ट्ये आहेत. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी भारतीय नागरिकांना माहितीचा अधिकार देण्यात आला आहे.

ii. माहितीचा अधिकार हा लोकशाहीमध्ये नागरिकांचे सक्षमीकरण करण्याचा एक प्रयत्न आहे. यामुळे, जनतेचा राज्यकारभारात प्रत्यक्ष सहभाग वाढत आहे.

iii. शासन आणि नागरिक यांच्यातील संवादामुळे लोकशाही अधिक सकस, सुदृढ व बळकट होण्यास मदत होत आहे.

iv. याबरोबरच शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी होऊन शासनाचे व्यवहार अधिक खुले व पारदर्शी होण्यास मदत झाली.

***३. हक्काधारित दृष्टिकोन**

**उत्तर:** i. स्वातंत्र्योत्तरकाळात काही दशकांमध्ये भारताचे लोकशाहीकरण व्हावे यासाठी अनेक सुधारणा केल्या.

ii. परंतु यामध्ये नागरिकांकडे 'लाभार्थी' म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन होता.

iii. मात्र, गेल्या काही दशकांमध्ये या सुधारणा 'नागरिकांचा हक्कच आहे' या भूमिकेतून केल्या जातात.

iv. यानुसार माहितीचा, शिक्षणाचा व अन्नसुरक्षेचा हक्क भारतीयांना मिळाला आहे.

Sample Content

Page no. **115** to **120** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# प्र.८ (ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

## पाठ १. संविधानाची वाटचाल

**१. तक्ता पूर्ण करा.**

i.


| | कायदे | उद्‌दिष्टे |
|---|---|---|
| अ. | ...................... | शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी करून तो अधिक पारदर्शक होण्यास मदत. |
| ब. | घरगुती हिंसाचार प्रतिबंधक | ...................... |

**उत्तर:**


| | कायदे | उद्‌दिष्टे |
|---|---|---|
| अ. | **माहितीचा अधिकार** | शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी करून तो अधिक पारदर्शक होण्यास मदत. |
| ब. | घरगुती हिंसाचार प्रतिबंधक | **पारंपरिक वर्चस्व आणि अधिकारशाहीला नाकारणे.** |

**२. संकल्पनाचित्र पूर्ण करा.**

i.




**उत्तर:**




[**टीप:** पाठ १ संबंधित प्रश्न नमुनादाखल सोडवून दिले आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांनी सर्व पाठांसंबंधित प्रश्नांची उत्तरे लिहिणे अपेक्षित आहे.]

Sample Content

Page no. 12**2** to **128** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# प्र.९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

## पाठ १. संविधानाची वाटचाल

***१. मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केल्यामुळे कोणते परिणाम झाले?**

**उत्तर:** मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे करून मतदानाचा अधिकार आणखी व्यापक केला आहे. याचे परिणाम पुढीलप्रमाणे झाले.

i. यामुळे, भारतामधील युवावर्गाला राजकीय अवकाश प्राप्त झाले.

ii. या बदलामुळे भारतीय लोकशाही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जात असून हा बदल केवळ संख्यात्मक नसून गुणात्मक स्वरूपाचाही ठरला आहे.

iii. अनेक राजकीय पक्ष या युवा मतदारांच्या पाठिंब्यामुळे सत्तेच्या स्पर्धेत उतरले आहेत.

iv. भारतातील राजकीय स्पर्धेचे स्वरूपही यामुळे बदलून लोकांच्या इच्छा-आकांक्षांना प्रतिनिधित्व देण्याच्या हेतूने आज अनेक पक्ष स्पर्धेत दिसत आहेत.

अशारीतीने, युवा मतदारांच्या सहभागामुळे भारतीय लोकशाहीची व्याप्ती वाढली आहे.

***२. सामाजिक न्याय प्रस्थापित करणे म्हणजे काय?**

**उत्तर:** i. ज्या सामाजिक बाबींमुळे व्यक्तीवर अन्याय होतो, तो दूर करून व्यक्ती म्हणून सर्वांना समान दर्जा आहे याचा आग्रह धरणे म्हणजेच सामाजिक न्याय प्रस्थापित करणे होय.

ii. जात, धर्म, भाषा, लिंग, जन्मस्थान, वंश, संपत्ती इत्यादींच्या आधारे कनिष्ठ, वरिष्ठ असा भेद न करणे, विकासाची समान संधी उप्लब्ध करून देणे हे न्याय व समतेमागील उद्दिष्ट आहे.

iii. संविधानाने सामाजिक न्याय व समता या मूल्यांवर आधारित एक नवा समाज निर्माण करण्याचा मार्ग स्पष्ट केला आहे.

iv. यासाठी सर्व समाजघटकांना सामावून घेण्याबाबत काही प्रयत्न केले जातात.

उदा. वंचित घटकांकरता शिक्षण व रोजगारामध्ये राखीव जागांची तरतूद, अल्पसंख्याकांना समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क यांबाबत तरतूद, तसेच स्त्रियांसाठीचे विविध कायदे इत्यादी.

***३. न्यायालयाने दिलेल्या कोणत्या निर्णयामुळे महिलांच्या सन्मान व प्रतिष्ठेची जपणूक झालेली आहे?**

**उत्तर:** न्यायालये ही व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करतात. यादृष्टीने न्यायालयाने अनेक निर्णय दिले आहेत.

i. महिला सक्षमीकरणासाठी, समाजात महिलांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी न्यायालयाने काही कायदे केले आहेत. उदा. हुंडा प्रतिबंधक कायदा हे एक महत्त्वाचे



Sample Content

Page no. **130** to **136** are purposely left blank. To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# नमुना प्रश्नपत्रिका

**वेळ: २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व कृती/प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

ii. उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतीचे पूर्ण गुण दर्शवतात.

iii. प्रश्न क्रमांक १ ते ५ प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक ६ ते ९ प्रश्न राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.

iv. प्रश्न क्रमांक १ (अ) आणि ६ मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.

v. प्रश्न क्रमांक २ (अ) आणि ८ (ब) मधील दिलेली संकल्पनाचित्रे त्याच नमुना आराखड्यानुसार पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

## इतिहास

**प्र.१.अ. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा.** **(३)**

i. मथुरा शिल्पशैली _______ काळात उदयास आली.

(अ) कुशाण (ब) गुप्त

(क) राष्ट्रकूट (ड) मौर्य

ii. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे पहिले सरसंचालक _______ हे होत.

(अ) अलेक्झांडर कनिंगहॅम (ब) विल्यम जोन्स

(क) जॉन मार्शल (ड) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

iii. भारतातील पहिले इंग्रजी वर्तमानपत्र _______ यांनी सुरू केले.

(अ) जेम्स ऑगस्टस हिकी (ब) सर जॉन मार्शल

(क) ॲलन ह्यूम (ड) बाळशास्त्री जांभेकर

**प्र.१.ब. पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व लिहा.** **(३)**

i.

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| अ. | प्रभाकर | आचार्य प्र. के. अत्रे |
| ब. | दर्पण | बाळशास्त्री जांभेकर |
| क. | दीनबंधू | कृष्णराव भालेकर |
| ड. | केसरी | बाळ गंगाधर टिळक |

Sample Content

Page no. **138** to **141** are purposely left blank. To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

**प्र.९. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा. (कोणताही एक)** **(२)**

i. मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केल्यामुळे कोणते परिणाम झाले?


ii. राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्यामुळे कोणते परिणाम होतात?

[**सूचना:** या नमुना प्रश्नपत्रिकेच्या उत्तरसूचीकरता शेजारी दिलेला **Q. R. Code** स्कॅन करा.]

Sample Content

# AVAILABLE BOOKS:

- Pre-Primary
- MH State Board
  - Std. I - X ▸ Eng. & Mar. Med.
  - Std. XI - XII ▸ Sci. & Com. (Eng. Med.)
- CBSE
  - Class X ▸ Eng. Med.
- Entrance Exams
  - Medical ▸ NEET, Online & Offline Test Series
  - Engineering ▸ MHT - CET, JEE (Main), Online & Offline Test Series
- General
  - Basics of Calculus Simplified
  - Career Margdarshak




A collection of Model Question Papers & Solutions of Std. X (Eng., Mar. & Semi Eng. Med.) based on NEW PAPER PATTERN




A collection of Model Question Papers & Solutions of Std. X (Mar. Med.) based on NEW PAPER PATTERN

**Visit Our Website**

**Target Publications® Pvt. Ltd.**
Transforming lives through learning.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org

Subscribe to our channel

Like our page